**राज्य मराठी विकास संस्था**
**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
इ-टपाल : rmvsmumbai@gmail.com; rmvs_mumbai@yahoo.com

**इ-निविदा सुचना क्र. १/२०२१**

**खालील कामासाठी राज्य मराठी विकास संस्था संगीत क्षेत्रातील नामवंत संगीतकार/संस्था यांच्याकडून मोहोरबंद निविदा मागवित आहे.**

| अ.क्र. | कामाचा तपशील | कामाची अंदाजित रक्कम | निविदेची किंमत | बयाणा रक्कम | विधिग्राह्य कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | **“ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक” तयार करण्यासाठी महाजालाद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत.** | रु. ९० लक्ष | रु. १५,०००/- | रु. १.५० लक्ष | ९० दिवस |

**निविदा सूचना व निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या** https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०९ / ०२ / २०२१ ते दि. २३ /०२/ २०२१ संध्याकाळी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा इच्छुकांसाठी सविस्तर माहिती संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर अवलोकनासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर निविदेच्या ऑनलाईन फॉर्मची किंमत रु. १५०००/- तसेच इसारा रक्कम रु.१.५० लक्ष इतकी राहील.

निविदेतील अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-निविदा योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करून व व्यवस्थित भरून दि. २३/०२/२०२१ रोजी सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत अथवा त्याअगोदर सादर करावी. सदर निविदा दिनांक २४/०२/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता उपस्थित निविदाकारांच्या समक्ष अथवा त्यांच्या प्रतिनिधी समक्ष राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयात उघडण्यात येतील. अधिक माहितीसाठी वरील कार्यालयात संपर्क करावा.

प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार, संचालक, राज्य मराठी विकास संस्था हे स्वत: जवळ राखून ठेवीत आहेत.

**सही/-**
**संचालक**
**राज्य मराठी विकास संस्था**

# राज्य मराठी विकास संस्था

३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

******************************************************************************

## “ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे.”

## निविदा प्रपत्र

कामाचे नाव :- **“ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे.”**

# राज्य मराठी विकास संस्था

**३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१**

**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

*************************************************************************

**"ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक"**

**कामाचे नाव :- "ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे."**

**१.० प्रस्तावना :-** महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाअंतर्गत असलेल्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे **"ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे"** प्रस्तावित आहे. सदर कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन करण्याकरिता निविदेद्वारे संगीतक्षेत्रातील नामवंत व्यक्ती अथवा संस्थेची नेमणूक करणे प्रस्तावित आहे. सदर कामाची व्याप्ती (Scope of work) सोबत **परिशिष्ट अ व परिशिष्ट १** मध्ये जोडलेले आहे. तसेच निविदेच्या अटी व शर्ती सोबत **परिशिष्ट ब** मध्ये जोडल्या आहेत.

**२.० निविदा विक्री :-** निविदा सूचना व निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ९.२.२०२१ ते दि. २३ .२.२०२१ संध्याकाळी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. सदर निविदेची रक्कम रु.१५,०००/- व EMDरक्कम रु.१.५० लक्ष/- ऑनलाईन पद्धतीने net banking द्वारे स्वीकारण्यात येईल. https://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर निविदाधारकांना इ-निविदा प्रणाली संबंधीत माहितीसाठी २४x७ टोलफ्री नं. ०१२०-४००१ ००२, ०१२०-४००१ ००५, ०१२०-६२७७ ७८७ ई-मेल support-eproc@nic.in या वर संपर्क साधावा.

**३.० निविदा सादर करणे :-**निविदेतील अटी व शर्तीमध्ये नमूद योग्य त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन पद्धतीनेhttps://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर दि. २३.२.२०२१ रोजी संध्याकाळी ३.०० वाजेपर्यंत अथवा त्याअगोदर सादर करावी. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

**४.० निविदा उघडणे :-** दि. २४.२.२०२१ रोजी दुपारी३.०० वाजता उपस्थित निविदाकारांच्या समक्ष अथवा त्यांच्या प्रतिनिधीसमक्ष राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयात इ-निविदा प्रणालीद्वारे उघडण्यात येतील.

**५.० कामाचा कालावधी:-**-९० दिवस

**६.० निविदा भरणे :-**निविदाकाराने निविदा प्रपत्राच्या प्रत्येक पृष्ठावर सही करून ऑनलाईन इ-निविदा प्रणालीद्वारे ती सादर करावी. निविदाकाराने त्यांचा निविदा दर हा सोबत जोडलेल्या **परिशिष्ट क** मध्ये दिलेल्या विहित नमुन्यात भरून ऑनलाईन इ-निविदा प्रणालीद्वारे सादर करावा. निविदा दर हा अंक व अक्षर अशा दोन्ही पद्धतीने भरावा. तसेच निविदाकाराने अनुभवाचे

प्रमाणपत्र व इतर निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सोबत सादर करावीत. निविदाकाराने ऑनलाईन इ-निविदा प्रणालीद्वारे दोन लिफाफ्यामध्ये कागदपत्रे सादर करावीत. लिफाफा १ मध्ये निविदाकाराचा अनुभव, इसारा (EMD) रक्कम रु. १.५० लक्ष /- भरल्याची पावती, परिशिष्ट ब मधील इतर कागदपत्रे सादर करावीत. लिफाफा २ मध्ये फक्त निविदा दर सादर करावा.

**७.० <u>निविदा स्वीकारणे :</u>** निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदाकाराची पात्रता तपासून पात्र निविदाकारांचे या क्षेत्रातील अनुभव सामर्थ्य तसेच पूर्वपीठिका आणि अर्थिक देकारानुसार यशस्वी निविदाकार ठरविण्यात येईल. तसेच प्राप्त झालेल्या निविदांमध्ये कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कोणतीही एका अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई हे राखून ठेवीत आहेत. अधिक माहितीसाठी वरील कार्यालयात कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक(०२२) २२६५३९६६ किंवा २२६३१३२५ संपर्क साधावा.

**८.० <u>निविदा मुल्यांकन (Bid Evaluation)</u> :** निविदा मुल्यांकन करताना निविदाकाराची पात्रता, यापूर्वी केलेल्या कामाचा अनुभव, काम पूर्ण करण्याची कार्यक्षमता सदर निविदेतील कामाच्या व्याप्तीप्रमाणे आवश्यक असणाऱ्या अनुभवावरुन तांत्रिक गुणांकन केले जाईल. यासाठी तांत्रिक बाबीसाठी ७०% व आर्थिक बाबीसाठी ३०% असे गुणांकन विचारात घेतले जाईल. तांत्रिक (Technical) व आर्थिक (Financial) गुणांची एकत्रित बेरीज करुन जास्त गुण असणारा निविदाकार हा यशस्वी निविदाकार असेल.

एकत्रित गुण (Combined Score) = (०.७० x तांत्रिक गुण) + (०.३० x अर्थिक गुण)

आर्थिक गुण (Financial Score)= १०० (Lowest Price/Price of proposal under consideration)

# राज्य मराठी विकास संस्था

**३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१**

**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

---

**“ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे. ”**

**<u>परिशिष्ट – अ</u>**

**संभाव्य निविदाकाराने पार पाडावयाची कामे (Scope of Work)**

१. ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्य पुस्तकात रूपांतर करण्यासाठी आवश्यक असलेले, गायक, वादक, अभिवाचक, उच्चारण तज्ज्ञ इत्यादींसाठी नामवंत कलाकार, अभ्यासक यांची निवड करणे.

२. या ग्रंथाचे श्राव्य पुस्तकात रूपांतर करण्यासाठी आवश्यक असलेले तांत्रिक साहाय्य, तंत्रज्ञ तसेच उच्च दर्जाच्या ध्वनिमुद्रण स्टुडिओची निवड करणे.

३. ज्ञानेश्वरीतील ओव्या नामवंत कलावंतांकडून ध्वनिमुद्रित करून घेताना शब्दांचे उच्चारण, वृत्त, छंद यांची तसेच स्वाभाविक लय, गती व नाद यांची काळजी घेणे.

४. ज्ञानेश्वरी हे श्राव्य पुस्तक संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर Upload करण्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही राज्य मराठी विकास संस्था करेल. परंतु पुस्तक संकेतस्थळावर Upload करतांना जर काही तांत्रिक सुधारणा आवश्यक असल्यास वा इतर तांत्रिक साहाय्य आवश्यक वाटले तर त्याची पूर्तता करण्यासाठी सहकार्य करावयाचे आहे.

५. यशस्वी निविदाकारांनी कार्यादेश मिळाल्यापासून पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत सदर श्राव्यपुस्तकाच्या निर्मितीचे संयोजन करून ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे राज्य मराठी विकास संस्थेच्या निकषांनुसार श्राव्यपुस्तकात गुणात्मकदृष्ट्या यशस्वीपणे रूपांतर करून संस्थेस सुपूर्द करावयाचे आहे.

६. ज्ञानेश्वरी या श्राव्यपुस्तकावर स्वामित्व हक्क हे राज्य मराठी विकास संस्थेचेच राहातील. त्यामुळे या ध्वनिमुद्रित पुस्तकांचा कोणताही गैरवापर वा दुरूपयोग होणार नाही याची काळजी घ्यावी. संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्ती वा संस्थेच्या वापरासाठी वा त्यांच्या संकेतस्थळावर ही पुस्तके उपलब्ध करून दिली जाणार नाहीत याची योग्य ती जबाबदारी संबंधितांची राहील.

७. राज्य मराठी विकास संस्थेची निर्मिती असलेल्या ज्ञानेश्वरी या श्राव्यपुस्तकावर संस्थेचे सर्वाधिकार असल्याने भविष्यात या श्राव्यपुस्तकाबाबत राज्य मराठी विकास संस्थेचा निर्णय अंतिम असेल. याबाबतची दक्षता संभाव्य निविदाकाराने घ्यावयाची आहे. याबाबत काही गैरप्रकार केल्याचे आढळल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या परिक्षेत्रात कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# राज्य मराठी विकास संस्था

**३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१**

**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

---

**“ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे. ”**

**परिशिष्ट – ब**

**निविदेच्या अटी व शर्ती**

**१) निविदा धारकाची वैयक्तिक माहिती**

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे पूर्ण नाव आणि पत्ता दूरध्वनी क्रमांक/ मोबाईल क्रमांक/ ई-मेल/ फॅक्स क्रमांक | |
| २. | आस्थापनेचे नाव व नोंदणी क्रमांक किंवा अर्जदार व्यक्ती असल्यास महाराष्ट्राचे वास्तव्याचे प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला, वीजदेयक अथवा दूरध्वनीदेयक अथवा महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा कोणताही किमान एक पुरावा | |
| ३. | सनदी लेखा परीक्षकाने प्रमाणित केलेले मागील ३ आर्थिक वर्षांचे सनदी लेखे (Audited Statement of account for last 3 financial years) | |
| ४. | नाटक, चित्रपट अथवा इतर मनोरंजनात्मक कार्यक्रमांच्या दिग्दर्शनाचा, श्राव्यपुस्तकांच्या निर्मिती, दिग्दर्शनाचा गेल्या २५ वर्षातील अनुभव; शासकीय किंवा शासनासाठी एखाद्या संस्थेमार्फत केलेल्या किमान ५० लक्ष इतक्या खर्चाच्या निर्मितीचा पूर्वानुभव असल्याचा पुरावा. | |
| ५. | निविदा फॉर्मची किंमत रु. १५,०००/- भरल्याची पावती. | |
| ६. | बयाणा रक्कम रु. १,५०,०००/- भरल्याचा पुरावा | |
| ७. | मागील तीन वर्षांचे भरलेले आयकर चलन – २०१७-१८, २०१८-१९आणि २०१९-२० | |
| ८. | पॅन क्रमांक | |
| ९. | यशस्वी निविदाकारांनी कार्यादेश मिळाल्यापासून पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत सदर श्राव्यपुस्तकाच्या निर्मितीचे संयोजन करून ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तकात गुणात्मकदृष्ट्या यशस्वीपणे रूपांतर करून संस्थेस सुपूर्द करावयाचे आहे. | |
| १०. | ज्ञानेश्वरी या श्राव्यपुस्तकावर स्वामित्व हक्क हे राज्य मराठी विकास संस्थेचेच राहातील. त्यामुळे या ध्वनिमुद्रित पुस्तकांचा कोणताही गैरवापर वा दुरूपयोग होणार नाही याची काळजी घ्यावी. संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्ती वा संस्थेच्या वापरासाठी वा त्यांच्या | |

| | | |
|---|---|---|
| | संकेतस्थळावर ही पुस्तके उपलब्ध करून दिली जाणार नाहीत याची योग्य ती जबाबदारी संबंधितांची राहील.<br>राज्य मराठी विकास संस्थेची निर्मिती असलेल्या ज्ञानेश्वरी या श्राव्यपुस्तकावर संस्थेचे सर्वाधिकार असल्याने भविष्यात या श्राव्यपुस्तकाबाबत राज्य मराठी विकास संस्थेचा निर्णय अंतिम असेल. याबाबतची दक्षता संभाव्य निविदाकाराने घ्यावयाची आहे. याबाबत काही गैरप्रकार केल्याचे आढळल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या परिक्षेत्रात कायदेशीर कारवाई करण्यात येईल. | |
| ११ | ज्ञानेश्वरीतील ओव्या नामवंत कलावंतांकडून ध्वनिमुद्रित करून घेताना शब्दांचे उच्चारण, वृत्त, छंद यांची तसेच स्वाभाविक लय, गती व नाद यांची काळजी घ्यायची आहे. | |
| १२ | ओव्यांचे ध्वनिमुद्रण WAVE File / 16bit, 1536 Kbps 44.1 KHz 2 Channels या नमुन्यात करावे. | |
| १३ | ध्वनिमुद्रिकेत कोणत्याही प्रकारचा व्यत्यय आणणारा त्रासदायक आवाज (हिस्) नसावा. | |
| १४ | श्री ज्ञानेश्वरीतील प्रत्येक अध्याय स्वतंत्र विभागात (folder) असावा तसेच प्रत्येक अध्याय स्वतंत्र ट्रॅकवर उपलब्ध व्हावा. तसेच संकेतस्थळावर लोकांना एखाद्या विशिष्ट अध्यायाचा शोध घेणे सोपे जावे. | |
| १५ | ध्वनिमुद्रण झाल्यानंतर या बोलक्या पुस्तकांच्या मूळ स्वरूपातील (WAVE File / 16bit, 1536 Kbps 44.1 KHz 2 Channels) मास्टर हार्ड ड्राईव्ह व दोन पेन ड्राईव्ह संस्थेस संग्रहासाठी द्याव्यात. तसेच संस्थेच्या संकेतस्थळावर Upload करण्यासाठी या ध्वनिमुद्रित बोलक्या पुस्तकांच्या दोन मास्टर पेन ड्राईव्हजMP3 या प्रकारात WAVE File / 16bit, 1536 Kbps 44.1 KHz 2 Channels या विहित नमुन्यात संस्थेस उपलब्ध करून द्याव्यात. | |
| १६ | श्री ज्ञानेश्वरी हे श्राव्य पुस्तक संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर Upload करण्यासाठी आवश्यक असलेली शासन पातळीवरील कार्यवाही राज्य मराठी विकास संस्था करेल. परंतु श्राव्यपुस्तक संकेतस्थळावर Upload करतांना जर काही तांत्रिक सुधारणा आवश्यक असल्या वा इतर तांत्रिक साहाय्य आवश्यक वाटले तर त्याची पूर्तता करण्यासाठी सहकार्य करायचे आहे. | |
| १७ | राज्य मराठी विकास संस्थेतील कार्यासन अधिकारी, हे या प्रकल्पाचे संयोजक व प्रकल्पप्रमुख या नात्याने जबाबदारी पाहातील. | |

| | | |
|---|---|---|
| १८ | राज्य मराठी विकास संस्थेची निर्मिती असलेल्या श्री ज्ञानेश्वरी या श्राव्य पुस्तकावर संस्थेचे सर्वाधिकार असल्याने भविष्यात या श्राव्य पुस्तकाबाबत राज्य मराठी विकास संस्थेचा निर्णय अंतिम असेल. | |
| १९ | सदर काम योग्य दिशेने चालू नसल्यास वा असमाधानकारक वाटल्यास सदर काम कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे प्राधिकार राज्य मराठी विकास संस्थेस राहातील. | |

**२) निविदाकाराने मागील पाच वर्षांच्या कालावधीत केलेल्या कामांची यादी.**

| अ.क्र. | ज्या आस्थापनेसाठी काम केले त्यांचे नाव, पत्ता व दूरध्वनी/मोबाईल क्रमांक | संपर्कासाठी नियुक्त केलेली व्यक्ती व संपर्कासाठी दूरध्वनी | आस्थापनेच्या कामाचे स्वरूप (शासकीय/निमशासकीय) | एकूण कामाची रक्कम (रुपयांत) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |

निविदाकाराने यापूर्वी किमान रु. ५० लाख (अक्षरी रुपये पन्नास लक्ष ) इतक्या रकमेचे शासकीय किंवा शासनासाठी एखाद्या संस्थेमार्फत काम केलेले असावे. तसेच संगीतक्षेत्रामध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव असावा.

(खास प्रकल्पाबाबत उल्लेख करावयाचा असल्यास वेगळ्या कागदावर स्पष्टता नमूद करावी.)

# राज्य मराठी विकास संस्था

**३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१**

**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

***************************************************************************

**“ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे. ”**

**परिशिष्ट -क**

**“ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक तयार करणे” यासाठी निविदा दराचा नमुना.**

मी खालीलप्रमाणे आमचे दर सर्व करांसहित कळवीत आहे. निविदा सूचनेतील सर्व अटी आम्हाला मान्य असून सदर निविदा आम्ही कोणत्याही अटी व शर्तीशिवाय सादर करत आहोत.

| **अ.क्र.** | **विषय** | **कामाचा तपशील** | **सर्व प्रकारच्या अनुज्ञेय करांसहित** |
|---|---|---|---|
| १ | **“ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे श्राव्यपुस्तक” तयार करणे.** | परिशिष्ट क्रमांक (अ) {परिशिष्ट १ सोबत} आणि (ब) यातील अटी आणि शर्तीप्रमाणे सर्व जबाबदाऱ्या पार पाडणे. | |

| | |
|---|---|
| रुपये: | |
| अक्षरी रुपये: | |

शिक्का:-

दिनांक:- स्वाक्षरी:-

पूर्ण नाव व पत्ता:-

Note:The Bidders are requested to rake the printout of the Financial Offer(परिशिष्ट -क)and the amount manually in the same and upload the PDF copy in the space mention as the financial cover.